सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४३०/४६५,
ई-मेल-desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक: क्र. १०/एडीएम/उन्हाळी सुट्टी/२०२१/ ४७० दिनांक: 23 JUN 2021

**विषय- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी सुट्टी बाबत.....**

संदर्भ : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.मरातंशिमं/का-४०/ललेे/उ.प.२१/२०२१/०७२, दि.८/६/२०२१

सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदान तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका संस्थांमधील (स्वायत्त तंत्रनिकेतनांव्यतिरीक्त इतर) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये २० दिवस हिवाळी व ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात येते.

त्याअनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार परीक्षेच्या कामासाठी, मंडळस्तरावरील कामकाज व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेश प्रक्रियेकरीता लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग थोपवून **दि. ०१ जुलै २०२१ ते दि.०९ ऑगस्ट २०२१ पर्यंत ४० दिवस उन्हाळी सुट्टी** देण्यात यावी.

तथापि सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची उन्हाळी परीक्षा २०२१ करीता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने वेळोवेळी घोषित केलेल्या सूचनांनुसार काम करणे आवश्यक आहे. परीक्षा सुरळीतपणे व विहित कालावधीमध्ये पार पडेल याची दक्षता घेऊन आवश्यक ती कार्यवाही करणे गरजेचे आहे. संचालनालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिताच्या प्रवेश प्रक्रियेच्या महत्वाच्या कामासाठी, विद्यार्थ्यांच्या सोयींसाठी संपूर्ण राज्यात सुविधाकेंद्रांची घोषणा करण्यात येते. प्रवेशप्रक्रियेच्या विविध कामासाठी संस्थास्तरावर मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक आहे. परीक्षा तसेच प्रवेशप्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेच्या प्राचार्यांची राहील. तातडीच्या व महत्वाच्या कामासाठी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना थोपविण्यात येईल त्यांनी उपरोक्त नमूद कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांना पुढे असेही कळविण्यात येते की, संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गाकडून परीक्षेच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा कालावधी व परीक्षेचा कालावधी यांचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या कामासाठी व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेश प्रक्रियेच्या कामासाठी लागणारा अधिकारी/कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापी सदर सुट्टी ४० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत- प्राचार्य, शासकीय, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर तत्सम पदविका संस्था (संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय यांचेमार्फत)

प्रत- माहिती व पुढील आवश्यक कार्यवाही करीता रवाना:

१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
४. कार्यासन क्र. २, २ अ, ४, ४अ, १२ मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई. त्यांनी सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

*E/Bhadekar/Circular Vacation 2020_21*